# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/अभि.धा.३८/निवडणूक निधी/४८०९/सन २०१६ दिनांक : ०५/०७/२०१६

विषय :- निवडणूकीसाठी संस्थेकडून निवडणूक निधी स्विकारताना जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी / तालुका सहकारी निवडणूक अधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी यांनी घ्यावयाच्या दक्षतेबाबत.

संदर्भ :- १) प्राधिकरणाचे आदेश जा.क्र.रासनिप्रा/परिश्रमिक/भत्ते/७७५/२०१४ दि.१७/११/२०१४.
२) प्राधिकरणाचे आदेश जा.क्र.रासनिप्रा/निवडणूक/बँक खाते/६६७/२०१४ दि.०३/११/२०१४.
३) प्राधिकरणाचे आदेश जा.क्र.रासनिप्रा/अ-ब वर्ग/नि.निधी/परिश्रमिक भत्ते/१०१५/२०१४ दि.०९/१२/२०१४.
४) प्राधिकरणाचे परिपत्रक जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-१/ड वर्ग निवडणूक खर्च/७९९७/ सन २०१५ दि.२३/०२/२०१५.
५) प्राधिकरणाचे आदेश जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-४/निवडणूक/बँक खाते/१३३८/२०१६ दि.०८/०३/२०१६.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१३) मधील तरतुदीनुसार "निवडणूक निधी" मधून निवडणूकीसाठी लागणारा सर्व खर्च करण्याची तरतूद आहे. सदर तरतूदीस अनुसरून प्राधिकरणाने जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी / तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांचे स्तरावर राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या नावाने बँक खाते उघडून सदर खात्यात संस्थेने निवडणूक निधी जमा करावयाचे व त्या निधीतून जिल्हा / तालुका सहकारी निवडणूक अधिका-याने निवडणूक निर्णय अधिका-यास निवडणूक खर्चासाठी निधी देण्याचे आदेश संदर्भिय आदेश / परिपत्रकाव्दारे निर्गमित केले आहेत.

सदर आदेशाव्दारे संस्थेने निवडणूकीकरीता लागणारा सर्व निधी उपरोक्त नमुद निवडणूक निधीच्या खात्यात धनादेश / धनाकर्षाव्दारे जमा करण्याच्या आणि अशा जमा निधीमधून आवश्यकतेनुसार जिल्हा / तालुका सहकारी निवडणूक अधिका-याने निवडणूक निर्णय अधिका-यास धनादेशाव्दारे निधी उपलब्ध करून देण्याच्या स्पष्ट सुचना यापुर्वीच निर्गमित करण्यात आल्या आहेत.

तथापि, सहकारी संस्थांच्या निवडणूका पार पाडताना निवडणूक निर्णय अधिकारी परस्पर संस्थेकडून निवडणूक निधी रोख किंवा धनादेश स्वरूपात प्राप्त करून घेत असल्याच्या आणि काही प्रसंगी निवडणूकीचा खर्च संस्थेस परस्पर करण्याच्या व त्याचे हिशोब निवडणूक निर्णय अधिका-यास सादर करण्याच्या सुचना देत असल्याचे प्राधिकरणाच्या निदर्शनास आले आहे. प्राधिकरणाकडे सादर करण्यात आलेल्या काही निवडणूक खर्चाच्या मंजुरीच्या प्रकरणात अशा प्रकारे निवडणूक निर्णय अधिका-याने परस्पर संस्थेकडून प्राप्त करून घेतलेला निवडणूक निधी किंवा संस्थेने परस्पर केलेला निवडणूक खर्च अशा स्वरूपाचे तपशील प्राप्त झाले आहेत. सदर बाब प्राधिकरणाने निर्गमित केलेल्या आदेशांचे उल्लंघन करणारी आहे. अशा बाबींची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था समितीची निवडणूक नियम २०१४ चे नियम ३ (पाच) अन्वये प्राधिकरण खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

## - : आदेश : -

१. प्राधिकरणाने विहीत केलेल्या मर्यादेत निवडणूकीस पात्र सहकारी संस्थेकडून निवडणूक निधीची रक्कम केवळ धनादेश / धनाकर्ष स्वरूपात जिल्हा / तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांनी जमा करून घ्यावी व असे धनादेश / धनाकर्ष केवळ प्राधिकरणाच्या नावे उघडलेल्या निवडणूक निधी खात्यात जमा करावे. कोणत्याही परिस्थितीत रोख रक्कम स्विकारू नये.

२. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकानुसार योग्य रक्कम निवडणूक निर्णय अधिकारी यांना रेखांकित धनादेशाच्या स्वरूपात अदा करावी. कोणत्याही परिस्थितीत वाहक धनादेश (बेअरर चेक) अथवा रोख स्वरूपात निवडणूक निधी अदा करू नये.

३. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी जिल्हा / तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांनी उपलब्ध करून दिलेल्या निवडणूक निधीतूनच निवडणूकीचा खर्च भागवावा. उपलब्ध निधी अपुरा असल्यास सविस्तर कारणमिंमासेसह जिल्हा / तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांचेकडे तत्काळ अतिरिक्त निवडणूक निधीची मागणी नोंदवावी. अपवादात्मक परिस्थितीत मंजुर मर्यादेपेक्षा जास्त निवडणूक निधी लागणार असल्यास जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांचेमार्फत प्राधिकरणास प्रस्ताव सादर करून प्राधिकरणाचे मंजुरीनंतरच जिल्हा सहकारी निवडणूक अधिका-याने जादा निवडणूक निधी संस्थेकडून प्राप्त करून घ्यावा. कोणत्याही परिस्थितीत निवडणूक प्रक्रिया सुरू असलेल्या संस्थेकडून परस्पर निवडणूक निधी प्राप्त करून घेवू नये.

४. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणूकीसंबंधी कोणताही खर्च परस्पर करणेबाबत संस्थेस सुचित करू नये. त्याचप्रमाणे निवडणूक प्रक्रिया सुरू असलेल्या सहकारी संस्थेने निवडणूकविषयक कोणत्याही बाबीवर परस्पर खर्च करू नये. सहकारी संस्थेने असा परस्पर खर्च केल्यास तो अपात्र समजून वसूलपात्र ठरविण्यात येईल.

उपरोक्त आदेश अ, ब, क व ड वर्गातील सर्व संस्थांसाठी लागू आहेत. सदर आदेशाचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास सदर बाबीस गंभीर शिस्तभंगाची कृती मानून त्याबाबत कार्यवाहीचा प्रस्ताव संबंधितांकडे पाठविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेशानुसार

(डॉ.आनंद जोगदंड)
सचिव,
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति,
जिल्हा / तालुका सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)